राष्ट्रीय कीर्तनकार

# श्री चारुदत्त गोविंदस्वामी आफळे

राष्ट्रीय कीर्तनकार श्री. चारुदत्त आफळे **यांनी मराठी विषय घेऊन B.A. पदवी प्राप्त केली व संगीत विषय घेऊन M.A. पदवी प्राप्त केली. आणि भक्तीसंगीत व नाट्यसंगीत यावर ते Ph.D. करीत आहेत.**
संगीत शिक्षणासाठी त्यांना अनेकांचे मार्गदर्शन लाभले.

उदारणार्थ मुकुंदबुवा गोखले, पित्रे बुवा, पं. आगाशे बुवा, पं. शरद गोखले, मधुकर खाडिलकर, पं. विजय बक्षी, ऋषिकेश बडवे आणिही अनेकांकडून.

शालेय वयापासून आजवर गेली ४० वर्षे बुवा संगीत रंगभूमीवर कार्यरत आहेत. त्यांनी सादर केलेल्या भूमिका –

नाट्यप्रयोगांसाठी त्यांनी नाट्यगीत गायनाचे विशेष मार्गदर्शन प्रसिद्ध ऑर्गन तपस्वी श्री. राजीव परांजपे यांच्याकडे घेतले.

श्री. शिलेदार यांच्या मराठी रंगभूमीच्या अनेक संगीत नाटकांना बुवांनी ऑर्गन साथ केली आहे. नाट्य अभिनयासाठी श्री. रवींद्र खरे, श्री. विजय गोखले व श्री. अशोकजी समेळ – यांच्याकडून मार्गदर्शन घेतले.

गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर. दीनानाथजींनी जुन्या काळात संगीत रंगभूमी गाजवली. रणदुंदुभी नाटकात दीनानाथांनी साकारलेली राणी तेजस्विनीची भूमिका खूप गाजली.

दीनानाथ मंगेशकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त ‘भरत नाट्य मंदिर, पुणे’ या संस्थेने दीनानाथांचे तेच नाटक पुन्हा सादर केले. त्यात दीनानाथांनी गाजवलेली स्त्री भूमिका साकारण्याचे भाग्य श्री. आफळे यांना मिळाले. तसेच राजर्षी शाहू महाराजांवरील शाहू या मालिकेत बालगंधर्वांचे काम करण्याचेही भाग्य मिळाले. हेमंती बॅनर्जी कृत बालगंधर्व वरील माहितीपटात बुवांनी बालगंधर्वांची भूमिका केली. ज्या माहितीपटाला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. नाट्यसेवेसाठी त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले.

पुणे मराठी ग्रंथालयाकडून पाटणकर पुरस्कार मराठी नाट्य परिषदेकडून – पं. पलुस्कर पुरस्कार,

बालगंधर्व रसिक मंडळाकडून – बालगंधर्व पुरस्कार,

मंगेशकर प्रतिष्ठानाकडून – मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार.

आजही अनेक विद्यापीठांमध्ये नाट्यसंगीताविषयी मार्गदर्शन करण्यासाठी बुवांना आमंत्रित केले जाते.

कीर्तन

आफळे घराण्याचा मूळ वसा म्हणजे कीर्तन. आफळे घराणे क्षेत्र माहुलीचे सज्जनगडाच्या पायथ्याचे. समर्थ रामदासस्वामींच्या समाधीमंदिराकडून आफळे कुटुंबाला कीर्तनसेवेचे व्रत मिळाले. हे व्रत बुवा निष्ठेने चालवीत आहेत. त्यांचे शिक्षण आई वडिलांकडेच झाले. वडील गोविंदस्वामी आफळे आणि आई सौ. सुधाताई गोविंद आफळे. सुधाताई उत्तम कीर्तन प्रवचन करीत. अधिक त्या होमिओपॅथीक डॉक्टर ही होत्या. आणि हिंदुमहासभेच्या कट्टर कार्यकर्त्या होत्या. आई वडिलांकडून मिळालेली समृद्ध कीर्तन विद्या जोपासत असताना – श्री. दत्तदासबुवा घाग, श्री. श्रीपादबुवा ढोले, श्री. सुंदरबुवा मराठे अशा नामवंत कीर्तनकारांचे मार्गदर्शन बुवांना लाभले. बुवांनी त्यांच्या आयुष्यातले पहिले कीर्तन वयाच्या पाचव्या वर्षी केले. शाळा महाविद्यालयात असताना देखील काही कीर्तने केली. पण पूर्णतः कीर्तन सेवा १९८८ पासून सुरु झाली.

१९८८ ते २०१८ या तीस वर्षांत देश विदेशातून ५००० चे वर कीर्तने त्यांनी केली आहेत. नाट्यप्रयोग, नाट्यगीते कार्यक्रम यांची संख्या वेगळी आहेच. महाराष्ट्रासह इंदोर, उज्जैन (मध्यप्रदेश), बडोदा (गुजरात), ग्वाल्हेर, लखनौ (उत्तरप्रदेश), दिल्ली, कोलकाता (बंगाल), हैद्राबाद (आंध्र), बेळगाव, बेंगलोर (कर्नाटक) इ. प्रांतातून कीर्तन, प्रवचने झाली. श्रीलंका, कुवेत, दुबई, मस्कत, दोहा, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया अशा परदेशातही कीर्तनाचा गजर पोहोचविला. कीर्तन करण्याबरोबर अनेक मुलामुलींना ते कीर्तनाचे प्रशिक्षण देतात.

दूरदर्शन

दूरदर्शन वरील अनेक वाहिन्यांवरून केलेली सेवा

- E TV मराठीवर ३ महिने मनोबोधावर प्रवचन.
- स्टार माझा वर पंढरी वारी निमित्त ज्ञानेश्वरी पारायण व वारी निरुपण.
- DD 10 वर विनय धुमाळे निर्मित गणेश दर्शन मालिकेत अनेक कीर्तने.
- Z टॉकीजवर “गजर कीर्तनाचा” कार्यक्रमात पूर्ण गणेशोत्सव कीर्तने.
- स्टार प्रवाह वर “नकुशी” मालिकेत २०० व्या भागात कीर्तन निरुपणे.

- अनेक भक्तीसंगीतांवरील कार्यक्रमांची निरुपण सेवा केली.
- E TV मराठी कडून सलग ५ वर्षे गणेश विसर्जन मिरवणुकीचे १० तास निरुपण केले आहे.
- मर्मबंध या टिळक – आगरकरांवरील मालिकेत भूमिका.

| **नाटक** | **भूमिका** |
|---|---|
| शाकुंतल | राजा दुष्यंत |
| सौभद्र | नारद व कृष्ण |
| मानापमान | सेनापती धैर्यधर |
| शारदा | कोदंड |
| मृच्छकटिक | चारुदत्त |
| कान्होपात्रा | संत चोखामेळा |
| विद्याहरण | देवगुरु कच |
| ययाती देवयानी | "" |
| भावबंधन | प्रभाकर |
| एकच प्याला | रामलाल |
| हे बंध रेशमाचे | श्रीकांत |

| नाटक | भूमिका |
| --- | --- |
| मत्स्यगंधा | पराशर |
| स्वरसम्राज्ञी | गंगाधरबुवा |
| रणदुंदुभी | राणी तेजस्विनी |
| इथे ओशाळला मृत्यू | संताजी |
| तो मी नव्हेच | गायक बुवा |
| आतून कीर्तन वरून तमाशा | हरिदास |
| कट्यार काळजात घुसली | सदाशिव / खाँसाहेब आफताब हुसेन |
| संगीत शंकरा | पं. शिवरंजन प्रसाद |